## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

## भारतीय चित्रपटसृष्टीच्या जादूला राष्ट्राचा सलाम

नवी दिल्ली, 20 सप्टेंबर 2026

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार — एक दृष्टिक्षेप**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हे चित्रपट क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी दिले जाणारे देशातील सर्वात प्रतिष्ठेचे पुरस्कार आहेत. 1954 **मध्ये स्थापन** झालेले हे पुरस्कार माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून दरवर्षी प्रदान केले जातात. सात दशकांहून अधिक काळ या पुरस्कारांनी भारतीय चित्रपट निर्मितीतील उत्कृष्ट सर्जनशील आणि तांत्रिक योगदानाचा गौरव केला आहे. हे पुरस्कार **सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म**, **नॉन-फीचर फिल्म आणि चित्रपटविषयक लेखन** अशा तीन क्षेत्रांचा समावेश करतात.

72**वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार** हे 2024 या वर्षातील भारतीय चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करणार आहेत. तीन परीक्षकांनी 18 **जुलै** 2026 रोजी पुरस्कार विजेत्यांची घोषणा केली. **भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते** 22 **सप्टेंबर** 2026 **रोजी गुजरातमधील एकता नगर** (**पूर्वीचे केवडिया**) येथे हे पुरस्कार प्रदान केले जातील.




हे पुरस्कार देशभरातील चित्रपट निर्मितीतील समृद्ध भाषिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक विविधतेचे प्रतिबिंब आहेत. मोठ्या व्यावसायिक चित्रपटांपासून छोट्या स्वतंत्र चित्रपटांपर्यंत सर्वांना ते एकाच राष्ट्रीय व्यासपीठावर आणतात. ही व्यापकता चित्रपट निर्माते आणि प्रेक्षकांमध्ये या पुरस्कारांना मिळणारे विशेष स्थान अधोरेखित करते.

**तुम्हाला माहिती आहे का?**

एका महत्त्वपूर्ण धोरणात्मक उपक्रमांतर्गत, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा देशाच्या विविध भागांमध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यातील पुरस्कार सोहळे राष्ट्रीय राजधानीबाहेर देशातील विविध राज्ये आणि शहरांमध्ये आयोजित केले जातील. एकता नगर येथे होणारा हा सोहळा देशभरातील चित्रपट क्षेत्रातील प्रतिभावंतांना एकत्र आणणार आहे. हा सोहळा 'एक भारत, श्रेष्ठ भारत'च्या भावनेचे प्रतीक ठरेल.

**वारसा आणि उत्क्रांती — 1954 पासून**

भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रवास 1913 मध्ये दादासाहेब फाळके यांच्या '**राजा हरिश्चंद्र**' या चित्रपटापासून सुरू झाला. 1949 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या **चित्रपट चौकशी समितीने** 'चित्रपटांसाठी राज्य पुरस्कार' सुरू करण्याची शिफारस केली. भारतीय चित्रपटसृष्टीतील कलात्मक आणि तांत्रिक उत्कृष्टतेला गौरव व प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार सुरू करण्यात आले. 1954 **मध्ये पुरस्कारांची स्थापना झाली आणि पहिल्या पुरस्कारांमध्ये** 1953 **मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटांचा गौरव करण्यात आला**.

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा पहिला सोहळा**

पहिल्या पुरस्कार सोहळ्यात **फीचर फिल्म**, **माहितीपट आणि बालचित्रपट** अशा तीन श्रेणींचा समावेश होता. मराठीतील '**श्यामची आई**' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट अखिल भारतीय फीचर फिल्मसाठी राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले. '**महाबलीपुरम**' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठी राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले, तर '**दो बीघा जमीन**' या चित्रपटाला गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात आले. अशा प्रकारे केवळ सात पुरस्कारांपासून झालेल्या या छोट्याशा प्रारंभाने भारतीय चित्रपटसृष्टीच्या राष्ट्रीय सन्मानाच्या सात दशकांचा प्रवास सुरू केला.

**पुरस्कारांचा विस्तार**

1967 मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटांसाठी कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी स्वतंत्र पुरस्कार सुरू करण्यात आले. **उत्तम कुमार आणि नर्गिस** यांना 1968 मध्ये अनुक्रमे पहिल्या सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कारांनी गौरवण्यात आले. त्यावेळी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार '**भारत**' आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार '**उर्वशी**' या नावाने ओळखला जात होता.

1969 **मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराची** स्थापना करण्यात आली आणि हा पुरस्कार सर्वप्रथम **देविका राणी** यांना प्रदान करण्यात आला. भारतीय चित्रपटसृष्टीचा आवाका जसजसा वाढत गेला, तसतशा नव्या श्रेणी आणि विविध तांत्रिक क्षेत्रांसाठीचे पुरस्कारही सातत्याने समाविष्ट करण्यात आले.

| वर्ष | महत्त्वाचा टप्पा |
|---|---|
| 1913 | दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' पूर्ण केला — भारतीय चित्रपट निर्मितीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा. |
| 1954 | 'चित्रपटांसाठी राज्य पुरस्कार' म्हणून पुरस्कारांची स्थापना. 1953 मधील चित्रपटांना पहिले पुरस्कार प्रदान. |

| | |
|---|---|
| 1967-68 | कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी पुरस्कार सुरू. उत्तम कुमार आणि नर्गिस यांना पहिल्या अभिनय पुरस्कारांचा सन्मान. |
| 1969 | दादासाहेब फाळके पुरस्काराची स्थापना. देविका राणी पहिल्या मानकरी. |
| 1973 | चित्रपट महोत्सव संचालनालयाने पुरस्कारांचे प्रशासन सुरू केले. |
| 2022 | चित्रपट महोत्सव संचालनालयाचे NFDC मध्ये विलीनीकरण; NFDC ही सध्याची अंमलबजावणी करणारी संस्था. |
| 2026 | 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची जुलैमध्ये घोषणा. गुजरातमधील एकता नगर येथे पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार. |

**उद्देश आणि महत्त्व**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची उद्दिष्टे अधिकृत नियमावलीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत. सौंदर्यात्मक आणि तांत्रिक उत्कृष्टता तसेच सामाजिक प्रासंगिकता असलेल्या चित्रपटांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे हा त्यांचा उद्देश आहे. देशातील विविध प्रदेशांची संस्कृती समजून घेण्यास आणि त्यांचे कौतुक करण्यास ते प्रेक्षकांना मदत करतात. अशा प्रकारे हे पुरस्कार राष्ट्राची **एकता आणि अखंडता** दृढ करण्यासही हातभार लावतात.

चित्रपट ही एक कलात्मक अभिव्यक्ती म्हणून त्याचा अभ्यास आणि आस्वाद घेण्यासही हे पुरस्कार प्रोत्साहन देतात. पुस्तके, लेख आणि परीक्षणांच्या माध्यमातून या कलाप्रकाराचे चिकित्सक मूल्यमापन अधिक व्यापक वाचकवर्गापर्यंत पोहोचते.

**राष्ट्रीय पुरस्काराचे महत्त्व**

राष्ट्रीय पुरस्कार मिळणे म्हणजे एखाद्या चित्रपटाने राष्ट्राने निश्चित केलेल्या **उच्च दर्जाच्या निकषांची पूर्तता केली आहे**, याची पुष्टी होय. अन्यथा केवळ मर्यादित प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचणाऱ्या कलाकृतींकडेही यामुळे अधिक प्रेक्षक आकर्षित होतात. हा सन्मान चित्रपट निर्मात्यासोबत पुढे जातो आणि त्याच्या आगामी प्रकल्पांसाठी नवीन संधींची दारे खुली करतो.

**पुरस्कारांची रचना**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे आयोजन **तीन विभागांमध्ये** केले जाते आणि त्यासोबत एक **जीवनगौरव सन्मान** दिला जातो. **फीचर फिल्म** विभागात पूर्ण लांबीच्या चित्रपटांचा समावेश होतो. **नॉन फीचर फिल्म चित्रपट** विभागात माहितीपट, लघुपट, ॲनिमेशन आणि इतर संबंधित प्रकारांचा समावेश होतो. **चित्रपटविषयक उत्कृष्ट लेखन** विभागात सर्वोत्कृष्ट पुस्तक आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट समीक्षकांचा सन्मान केला जातो. **दादासाहेब फाळके पुरस्कार** हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान म्हणून स्वतंत्र स्थान राखतो.

| विभाग | श्रेणी | पदक | रोख पारितोषिक |
|---|---|---|---|
| **फीचर फिल्म** | 26 (विशेष उल्लेखांसह) | सुवर्ण कमळ, रजत कमळ | ₹3,00,000 आणि ₹2,00,000 |

| | | | |
|---|---|---|---|
| **नॉन- फीचर फिल्म** | 16 (विशेष उल्लेखांसह) | सुवर्ण कमळ, रजत कमल | ₹3,00,000 आणि ₹2,00,000 |
| **चित्रपटविषयक उत्कृष्ट लेखन** | 2 | सुवर्ण कमळ | ₹1,00,000 |
| **दादासाहेब फाळके पुरस्कार** | 1 | सुवर्ण कमळ, शाल | 72व्या एनएफए साठी ₹10,00,000 |

फीचर फिल्म विभागात **सर्वोत्कृष्ट** फीचर फिल्म, **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेता** यांसह इतर पुरस्कारांचा समावेश आहे. यामध्ये **सर्वोत्कृष्ट बालचित्रपट**, **सर्वोत्कृष्ट छायाचित्रण**, **सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन आणि सर्वोत्कृष्ट वेशभूषा रचना** यांचाही समावेश आहे.

नॉन फीचर फिल्म विभागात **सर्वोत्कृष्ट माहितीपट**, **सर्वोत्कृष्ट लघुपट आणि सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन चित्रपट** यांचा समावेश आहे. यामध्ये **सर्वोत्कृष्ट कला आणि संस्कृतीविषयक चित्रपट**, **सर्वोत्कृष्ट निवेदन किंवा व्हॉइस ओव्हर आणि सर्वोत्कृष्ट पटकथा** यांसह इतर पुरस्कारही दिले जातात.

**प्रत्येक भाषेला स्थान**

संविधानाच्या **आठव्या अनुसूचीमध्ये** नमूद केलेल्या प्रत्येक भाषेतील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मला पुरस्कार दिला जातो. आठव्या अनुसूचीबाहेरील भाषांमधील चित्रपटांना स्वतंत्र पुरस्कारांच्या माध्यमातून गौरवण्यात येते. 72**व्या आवृत्तीत गढवाली भाषेतील 'ढोली' आणि तुळू भाषेतील** 'IMBU' या चित्रपटांना या तरतुदीनुसार गौरवण्यात आले.

**पुरस्कारांची निवड कशी केली जाते**?

दरवर्षी मागील कॅलेंडर वर्षात प्रमाणित झालेल्या चित्रपटांसाठी प्रवेशिका मागवण्यात येतात. त्यानंतर मंत्रालयाकडून पुरस्कारांच्या तीन विभागांसाठी स्वतंत्र परीक्षक मंडळे स्थापन केली जातात. चित्रपट, संबंधित कला प्रकार आणि मानवविद्या क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींची परीक्षक मंडळाचे सदस्य म्हणून निवड केली जाते.



## वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांसाठी द्विस्तरीय परीक्षण

57 **व्या आवृत्तीपासून** वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांचे मूल्यांकन द्विस्तरीय प्रक्रियेद्वारे केले जाते. देशाच्या विविध भागांतून प्राप्त झालेल्या प्रवेशिकांची प्राथमिक निवड **पाच प्रादेशिक परीक्षक मंडळे** करतात. त्यानंतर केंद्रीय परीक्षक मंडळ वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट विभागातील अंतिम विजेत्यांची निवड करते.

नॉन-फीचर फिल्म विभाग आणि चित्रपटविषयक उत्कृष्ट लेखन विभागासाठी स्वतंत्र परीक्षक मंडळे असतात. **दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी प्रवेशिका मागवल्या जात नाहीत**. या पुरस्कारासाठी वेगळी प्रक्रिया असते. प्रतिष्ठित चित्रपट व्यक्तिमत्त्वांचा समावेश असलेली विशेष समिती पुरस्कारासाठी मानकरी व्यक्तीची शिफारस करते.

## 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची परीक्षक मंडळे

**श्री जयराज** यांनी 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसाठीच्या फीचर फिल्म परीक्षक मंडळाचे अध्यक्षपद भूषवले. **श्री असीम सिन्हा** यांनी याच वर्षासाठीच्या नॉन फीचर फिल्म परीक्षक मंडळाचे अध्यक्षपद भूषवले. **श्री ए. चंद्रशेखर** यांनी चित्रपटावरील उत्कृष्ट लेखन परीक्षक मंडळाचे अध्यक्षपद भूषवले.

## पात्रतेचा थोडक्यात आढावा

पुरस्काराच्या वर्षात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून (CBFC) प्रमाणित झालेले आणि इंग्रजी सबटायटल असलेले चित्रपटच पात्र ठरतात. चित्रपटाचा कालावधी 72 मिनिटांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. यापूर्वी सादर करण्यात आलेल्या डब केलेल्या, पुनर्निर्मित किंवा पुन्हा संपादित केलेल्या आवृत्त्या पात्र ठरत नाहीत.

## भारतीय चित्रपटसृष्टीतील विविधतेचा गौरव

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये देशाच्या प्रत्येक भागात तयार होणाऱ्या चित्रपटांचा विचार केला जातो. 72व्या पुरस्कारांमध्ये मराठी, संथाली, तमिळ, मल्याळम, तेलुगू आणि कन्नड भाषेतील चित्रपटांचा गौरव करण्यात आला. तुळू आणि गढवालीसह इतर अनेक भाषांतील चित्रपटांनाही मान्यता मिळाली. प्रथमच **संथाली चित्रपटाला नॉन-फीचर** विभागात सन्मानित करण्यात आले.

श्री रवी राज मुर्मू दिग्दर्शित **अँगेन** या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाच्या चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. अशा प्रकारची पहिलीच मान्यता भारतीय चित्रपटसृष्टीचा नकाशा आणखी विस्तारते.

## नवी आवृत्ती — ठळक वैशिष्ट्ये

72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसाठी 2024 या वर्षात प्रमाणित झालेल्या भारतीय चित्रपटांचा समावेश करण्यात आला आहे. या पुरस्कारांमध्ये **आर्टिकल** 370 या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. याच चित्रपटासाठी यामी गौतम हिला प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. **ब्रह्मयुगम** आणि चंदू चॅम्पियन या अनुक्रमे मल्याळम आणि हिंदी चित्रपटांसाठी मम्मूट्टी आणि कार्तिक आर्यन यांनी प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार संयुक्तपणे पटकावला.

तमिळ चित्रपट **अमरन**साठी श्री राजकुमार पेरियासामी यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. **कल्की** 2898 **एडी** या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट, चांगले मनोरंजन प्रदान करणारा या श्रेणीतील पुरस्कार मिळाला. **स्वातंत्र्यवीर सावरकर** या चित्रपटासाठी रणदीप हुड्डा यांना

सर्वोत्कृष्ट पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाच्या चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. **भंगार** या चित्रपटाची सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर म्हणून निवड करण्यात आली, तर **राम-नामी** या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार मिळाला.




**सध्याचे पुरस्कार विजेते** — 72**वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार**

खाली 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमधील प्रमुख पुरस्कारांची माहिती दिली आहे. भाषावार पुरस्कार, तांत्रिक श्रेणी आणि विशेष उल्लेख यांची नोंद स्वतंत्रपणे करण्यात आली आहे.

| **पुरस्कार** | **चित्रपट (भाषा)** | **पुरस्कार विजेते** |
|---|---|---|
| **सर्वोत्कृष्ट चित्रपट** | आर्टिकल 370(हिंदी) | निर्माते: जिओ स्टुडिओज आणि बी62 स्टुडिओज; दिग्दर्शक: आदित्य सुहास जांभळे |
| **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन** | अमरन (तमिळ) | राजकुमार पेरियासामी |
| **प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेता** | ब्रह्मयुगम (मल्याळम); चंदू चॅम्पियन (हिंदी) | मम्मूट्टी आणि कार्तिक आर्यन (संयुक्त) |
| **प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** | आर्टिकल 370 (हिंदी) | यामी गौतम |
| **सहाय्यक भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेता** | भक्षक (हिंदी) | संजय मिश्रा |

| | | |
|---|---|---|
| **सहाय्यक भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** | महाराजा (तमिळ); मिथ्या (कन्नड) | सचाना नमिदास आणि रोपश्री वरकाडी (संयुक्त) |
| **दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा चित्रपट** | स्वातंत्र्यवीर सावरकर (हिंदी) | रणदीप हुड्डा |
| **सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट, निकोप मनोरंजन प्रदान करणारा** | कल्की 2898 एडी (तेलुगू) | निर्माता: वैजयंती मूव्हीज; दिग्दर्शक: नाग अश्विन सिंगिरेड्डी |
| **राष्ट्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय मूल्यांना प्रोत्साहन देणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट** | कॅप्टन मिलर (तमिळ) | निर्माता: सत्य ज्योती फिल्म्स; दिग्दर्शक: अरुण माथेश्वरन |
| **सर्वोत्कृष्ट बालचित्रपट** | 35 - चिन्ना कथा काडू (तेलुगू) | निर्माते: एस ओरिजिनल्स आणि वॉल्टेअर प्रॉडक्शन्स; दिग्दर्शक: नंदा किशोर इमानी |
| **सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन** | आर्टिकल 370 (हिंदी); अमरन (तमिळ) | शाश्वत सचदेव (गीते); जी. व्ही. प्रकाश कुमार (पार्श्वसंगीत) |
| **सर्वोत्कृष्ट गैर-चित्रपट** | भंगार (मराठी आणि इंग्रजी) | निर्माती व दिग्दर्शक: सुमिरा रॉय |
| **दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा चित्रपट (गैर-चित्रपट)** | अँगेन (संथाली) | दिग्दर्शक: रवी राज मुर्मू |
| **सर्वोत्कृष्ट माहितीपट** | राम-नामी (हिंदी) | निर्माता: बीबीपी स्टुडिओ व्हर्च्युअल भारत प्रा. लि.; दिग्दर्शक: भारतबाला गणपती |
| **सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन (गैर-चित्रपट)** | स्टॅच्यू ऑफ युनिटी - एकता का प्रतीक (हिंदी) | आनंद एल. राय |
| **चित्रपटावरील सर्वोत्कृष्ट पुस्तक** | नानिरुवुदे निमागागी नादिरुवुदे नानागागी (कन्नड) | लेखक: केनचनुरू प्रदीप कुमार शेट्टी; प्रकाशक: मिरर पुस्तक |
| **सर्वोत्कृष्ट चित्रपट समीक्षक** | हिंदी | संजीव श्रीवास्तव |


पुरस्कार विजेते आणि परीक्षक मंडळांची संपूर्ण यादी पाहा

**दादासाहेब फाळके पुरस्कार**

दादासाहेब फाळके पुरस्कार हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान आहे. 1969 मध्ये या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आणि तो सर्वप्रथम देविका राणी यांना प्रदान करण्यात आला. 1913 मध्ये **राजा हरिशचंद्र** या चित्रपटाचे दिग्दर्शन करणारे दादासाहेब फाळके यांच्या स्मरणार्थ हा

पुरस्कार देण्यात येतो. भारतीय चित्रपटसृष्टीच्या विकास आणि वृद्धीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

**तुम्हाला माहिती आहे का?**




धुंडिराज गोविंद फाळके (1870-1944), ज्यांना दादासाहेब फाळके म्हणून ओळखले जाते, यांनी 1913 मध्ये **राजा हरिशचंद्र** या भारतातील पहिल्या पूर्ण लांबीच्या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. त्यानंतर त्यांनी 94 पूर्ण लांबीचे चित्रपट आणि 27 लघुपट तयार केले. **भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक** म्हणून गौरविण्यात आलेल्या दादासाहेब फाळके यांच्या स्मरणार्थ भारत सरकारने 1969 मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार सुरू केला.

**दादासाहेब फाळके पुरस्कार** 2024

2024 साठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार **अनंत नाग** यांना प्रदान करण्यात येणार आहे. भारत सरकारने 16 सप्टेंबर 2026 रोजी याबाबतची घोषणा केली. त्यांचा जन्म 4 सप्टेंबर 1948 रोजी कर्नाटकात झाला आणि त्यांनी सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. कन्नड चित्रपट **संकल्प**मधून त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले, तर **अंकुर** या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले.

त्यांनी सहा भारतीय भाषांमधील 300 हून अधिक चित्रपटांमध्ये विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिका **मालगुडी डेज**मध्येही त्यांनी काम केले आहे. त्यांना पाच फिल्मफेअर पुरस्कार आणि कर्नाटक राज्याचे पाच सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाले आहेत. भारत सरकारने 2025 मध्ये त्यांना **पद्मभूषण** पुरस्काराने सन्मानित केले. त्यांचा चित्रपटसृष्टीतील प्रवास पाच दशकांहून अधिक काळाचा असून, त्यांनी कलाकारांच्या अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आहे.

**अलीकडील पुरस्कारप्राप्त व्यक्ती**

मोहनलाल यांना 2023 या वर्षासाठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री मिथुन चक्रवर्ती यांना 2022 या वर्षासाठीचा पुरस्कार मिळाला. श्रीमती वहीदा रहमान यांना 2021 या वर्षासाठीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रत्येक पुरस्कार संबंधित वर्षाच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात येतो.

**भारतीय चित्रपटसृष्टी : संस्कृती, अस्मिता आणि प्रभाव**

चित्रपट हे भारतातील सर्वाधिक अभिव्यक्तीक्षम कला प्रकारांपैकी एक असून, देशाच्या सर्वात प्रभावी सांस्कृतिक संपत्तींपैकी एक आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या मते, सर्जनशीलता, संस्कृती आणि नवोन्मेषासाठी चित्रपट हे एक प्रभावी माध्यम आहे. कलात्मक अभिव्यक्तीच्या पलीकडे जाऊन, चित्रपट क्षेत्र एका व्यापक सर्जनशील अर्थव्यवस्थेला आधार देते. भारताचे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र आता जगातील पाचव्या क्रमांकाचे सर्वात मोठे क्षेत्र बनले असून, त्याला 20 ते 25 लाख डिजिटल निर्मात्यांचा तसेच ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स सेवांमध्ये 40 ते 60 टक्के खर्चातील लाभाचा आधार आहे. भारतीय चित्रपट देशाची सांस्कृतिक ताकद जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत असून, सांस्कृतिक वारसा अधिक मजबूत करण्याबरोबरच विविध भाषा आणि प्रदेशांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करत आहेत.

**भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाची अखंड परंपरा**

आज भारतीय चित्रपटसृष्टी पूर्वीपेक्षा अधिक भाषा आणि विविध स्वरूपांमधून प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हे देशातील चित्रपटसृष्टीतील गुणवत्तेचे प्रमुख मापदंड म्हणून कायम आहेत. केवळ व्यावसायिक यशाच्या प्रमाणाऐवजी, ते कलाकौशल्य, धाडस आणि दृष्टीकोनातील स्पष्टता यांचा गौरव करतात.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा एकता नगर येथे आयोजित करण्याचा निर्णय या पुरस्कारांना राजधानीबाहेरील प्रेक्षकांच्या अधिक जवळ घेऊन जातो. भविष्यातील पुरस्कार सोहळे देशातील विविध राज्ये आणि शहरांमध्ये आयोजित केले जातील. मोठ्या चित्रपट स्टुडिओंपासून दूर विकसित होणाऱ्या चित्रपट संस्कृतींनाही आता राष्ट्रीय व्यासपीठ मिळणार आहे.

72वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार या आश्वासक वाटचालीचे अनेक प्रकारे दर्शन घडवतो. प्रथमच एका संथाली चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या मानकरी यादीत समावेश झाला आहे. कन्नड चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ कलाकाराला या क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान प्राप्त होत आहे. अशा प्रकारे, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार कला आणि राष्ट्र या दोन्हींच्या सेवेत आपली भूमिका सातत्याने बजावत आहेत.


**References**

Ministry of Information & Broadcasting (MIB)

- https://mib.gov.in/sites/default/files/2024-12/71st_nfa-2023-regulation-english.pdf
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1690048&reg=48&lang=2
- https://www.pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=2088704&reg=48&lang=2
- https://www.pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2126844&reg=48&lang=2
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2170309

- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2279150&reg=3&lang=1
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2286143
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2307783
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2310989
- https://www.pib.gov.in/PressNoteDetails.aspx?NoteId=153260&ModuleId=3&reg=3&lang=1
- https://nfaindia.org/images/pdf/1st%20National%20Film%20Award%20Catalogue.pdf

Ministry of Commerce and Industry (Department of Commerce)

- https://www.ibef.org/industry/media-entertainment-india

पीडीएफ येथे पाहता येईल

नितीन फुल्लुके / नेहा कुलकर्णी/प्रिती मालंडकर